शिवराम कृष्णा दळवी वि.

यशोदा न्हानू दळवी वगैरे

**निशाणी क्रमांक १२३ वरील आदेश**

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१३ यांचे वारसांना प्रतिवादी म्हणून सामील करून घेणेची परवानगी मागितलेली आहे.

२. वादीच्या मते, सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना यातील प्रतिवादी क्र.१३ श्रीमती सिताबाई शांताराम परब ही दि.१८/०५/२०२१ रोजी मयत झाली आहे. प्रतिवादी क्र.१३ ही मयत झालेबाबतची माहीती वादी यांना ऑक्टोबर २०२१ मधील शेवटच्या आठवडयात झाली. त्यानंतर त्यांनी मयत प्रतिवादी यांच्या मृत्यू प्रमाणपत्र व वारसांची माहिती मिळविली. प्रतिवादी क्र.१३ यांना श्री. प्रशांत शांताराम परब (मुलगा), श्री. जयप्रकाश शांताराम परब (मुलगा), श्री. समिर शांताराम परब (मुलगा), सौ. सुहासिनी सदानंद परब (मुलगी), सौ. अंकिता अभिमन्यु नाईक (मुलगी), सौ. जयश्री जगदेव गवस (मुलगी) हेच नजीकचे व कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्याकामी प्रतिवादी म्हणून सामील करणेची परवानगी वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली आहे.

३. प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी आपले म्हणणे दाखल करुन जास्तीत जास्त खर्च आकारण्याची विनंती केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने सरस निरस धडेवाटप होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठर्थ वादीने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. तसेच वादी यांनी नि.१२६ लगत मयत प्रतिवादी क्र.१३ हीचे मृत्यूप्रमाणपत्राची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. दाव्याचा

निकाल गुणदोषावर लागणेसाठी तसेच, नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे मयत प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. वादीने सरनाम्यामध्ये निशाणी क्र.१२३ वरील अर्जाप्रमाणे दुरूस्ती करणेची परवानगी देण्यात येते.

३. वादी यांनी सदर आदेशाप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेची आहे व दाव्याची दुरूस्त प्रत पुढील तारखेस वा तत्पूर्वी दाखल करावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

दिनांक– १७/०३/२०२५
ठिकाण– सावंतवाडी

(श्रीमती आर.जी.कुंभार)
सह दिवाणी न्यायाधीश, (क. स्तर),
सावंतवाडी.